मित्रांनो...

**गुरुवार दि. १३ मार्च २०२५ रोजी "चलो आझाद मैदान" आंदोलनामध्ये आपण सहभागी होणार आहोत.** आपल्यापैकी काहीजण पहिल्यांदाच आझाद मैदानावरील आंदोलनामध्ये सहभागी होणार असतील. आंदोलनात सहभागी होणाऱ्या सदस्यांसाठी काही सूचना.

१. आझाद मैदान हे छत्रपती शिवाजी टर्मिनस (CST) ह्या मध्यरेल्वेच्या स्टेशनमधून सबवेने बाहेर पडले की अगदी समोरच आहे.
२. आझाद मैदानामध्ये अनेक आंदोलने सुरू असतील. टॅफनॅपच्या आंदोलनासाठी आपण स्वतंत्र पेंडॉलची व्यवस्था केलेली आहे. आपल्या आंदोलनासाठी आपण टॅफनॅपच्या पेंडॉलमध्ये यावे. हे आंदोलन टॅफनॅप, मुक्ता, सारती व इतर समविचारी संघटनांच्या वतीने करण्यात येत आहे.
३. आंदोलनासाठी आपल्या युनिटचा किमान ४ x ३ फुट साईजचा फ्लेक्स बॅनर सोबत आणावा. बॅनरचा मजकूर

| |
|---|
| **भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक शुल्क नियामक प्राधिकरणासाठी** |
| चलो आझाद मैदान |
| टॅफनॅप - युनिट (आपल्या युनिटचे नांव) |

असा असावा.
४. मुंबईमध्ये सध्या उन्हाचा खूप तडाखा आहे, त्यामुळे येताना टोपी, पाण्याची बाटली सोबत ठेवावी.
५. मुंबईमध्ये आपणांस काही अडचण आल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा:
    १. प्रा. राम यादव - ८८०६५९०९७४
    २. प्रा. गोविंद वाघमारे - ८६९१९५२२२७
    ३. प्रा. सौ. नेहा कोरडे - ८६५५१११२०१
६. टॅफनॅपचे हे धरणे आंदोलन कोणत्याही वैयक्तिक मागण्यांकरीत नसून व्यापक सामाजिक सुधारणेसाठी आहे. स्वत:साठी तर आपण रोजच जगत असतो, एक दिवस समाजासाठी द्या, मला खात्री आहे की ह्या आंदोलनामध्ये सहभागी होवून तुम्हाला एक Lifetime Memorable अनुभव मिळेल ज्याचा तुम्हाला कायम अभिमानच वाटेल.
७. **सर्वात महत्वाचे** - टॅफनॅपच्या ह्या ग्रुपवरील जे सदस्य आंदोलनामध्ये सहभागी होणार आहेत त्यांनी ग्रुपवर आपल्या नावानिशी **"मी येतोय, तुम्हीही येणार ना?"** असा मेसेज टाकावा. उदा. "मी येतोय, तुम्हीही येणार ना?- प्रा. श्रीधर वैद्य"
८. आपल्या युनिटच्या जास्तीत जास्त सदस्यांना चलो आझाद मैदान आंदोलनामध्ये सहभागी व्हायचे आवाहन करा.